**MHOS190029422025**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.९१४/२०२५ मधील**
**निशाणी क्र. १ वरील आदेश**
**(CNRNo.MHOS190029422025)**

१. प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील कलम २ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे -

२. अर्जदार क्र.१,२ व ४ हया कै. खैय्युम महेबुब सय्यद यांच्या मुली असून अर्जदार क्र. ३ व ५ हे मुले आहेत. कै. खैय्युम महेबुब सय्यद हे दि.०६.१०.२०२५ रोजी मौजे मसला खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे मयत झाले आहेत. मयत खैय्युम महेबुब सय्यद यांची पत्नी नामे २६.०४.२०१९ रोजी मयत झालेली आहे तर आई नामे हफिजा महेबुब सय्यद हया यापुर्वीची मयत झालेल्या आहेत. मयत खैय्युम महेबुब सय्यद यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकिय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व वारसप्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर दि.२४.०१.२०२६ रोजी 'दै.आम संघर्ष टाईम्स', धाराशिव या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रकाशीत करून आक्षेप मागवणेत आले. परंतु, आजपर्यंत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

४. अर्जदार यांनी अर्ज शाबीत करणेकरीता अर्जदार क्र.५ जलील खय्युम सय्यद यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ हाजुबाबा अब्दुल अजीज इनामदार यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र. २ आबाराव अनुरथ जाधव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी तोंडी पुरावा संपल्याची पुरसीस नि. क्र.१४ वर दाखल केली आहे.

५. अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस. टी. पवार यांनी युक्तीवाद केला. अर्जदार खालील कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहेत.

१) ग्राम पंचायत कार्यालय, मसला खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी दिलेले मयत खैय्युम महेबुब सय्यद यांचे मृत्युप्रमाणपत्र नि. ४/१ वर दाखल केले आहे.
२) ग्राम पंचायत कार्यालय, मसला खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी दिलेले मयत रुकुंबी खैय्युम सय्यद यांचे मृत्युप्रमाणपत्र नि. ४/२ वर दाखल केले आहे.
३) दै. आम संघर्ष टाईम्स ', धाराशिव या वृत्तपत्रामधील दि.२४.०१.२०२६ रोजीचे आवृत्तीमधील जाहीर प्रगटन नि.१० वर दाखल आहे.

६. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.५ जलील खय्युम सय्यद यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ हाजुबाबा अब्दुल अजीज इनामदार यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र. २ आबाराव अनुरथ जाधव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केले असून त्यांच्या पुराव्यावरून कै.खैय्युम महेबुब सय्यद हे दि.०६.१०.२०१५ रोजी मयत झाले असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाहीत असे दिसुन येते. अर्जदार यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा अबाधीत आणि अखंड विना आव्हानीत

राहिलेला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरून अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत खैय्युम महेबुब सय्यद यांचे कायदेशीर वारसदार असल्याचे अर्जदार यांनी शाबीत केले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ बेबी अहमद फकीर, अर्जदार क्र.२ अमिना रफिक शेख, अर्जदार क्र. ३ सत्तर खय्यम इनामदार (सय्यद), अर्जदार क्र. ४ हसीना रहिम शेख व अर्जदार क्र. ५ जलील खय्युम सय्यद हे मयत खैय्युम महेबुब सय्यद यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येते.

३. अर्जदार यांच्या नावे वारसप्रमाणपत्र अर्जदारांकडुन नियमाप्रमाणे न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेऊन देण्यात यावे.

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2026.06.09 16:28:27 +0530

ठिकाण - तुळजापूर.
दिनांक – ०९/०६/२०२६

(श्रीमती. एस.डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues are same, word to word, as per the original judgment/order/issues.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District - Osmanabad. |
| Date | --- | 09/06/2026 |
| Judgment/order/issues signed by the Presiding Officer on | --- | 09/06/2026 |
| Judgment/order/issues uploaded on | --- | 09/06/2026 |